1

जा.क्र.एमएच/मुअ३/काअ२/प्रा./ /२६
प्रधानमंत्री आवास योजना.
दिनांक. /०२/२०२६.

**विषय :-** प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत परवडणारी घरे वितरीत करताना कोणतेही आरक्षण न ठेवणेबाबत.

# परिपत्रक

माननीय पंतप्रधान महोदयांच्या सर्वांसाठी घरे या संकल्पनेच्या अंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना सुरु करण्यात आली आहे. परवडणाऱ्या घराची मागणी विचारात घेऊन केंद्र शासनाने भूतपुर्व प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) तसेच सध्याच्या प्रधानमंत्री आवास योजना २.० ची अंमलबजावणी करण्याबाबतच्या वेळोवेळी मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत.

सदर योजनेतर्गत घटक क्र. ३ म्हणजेच भागीदारी तत्वावर परवडणारी घरे AHP या घटकाकरिता प्रकल्प राबविण्याचे काम म्हाडा अंतर्गत विविध मंडळाकडून हाती घेतले जाते. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) योजनेकरिता प्रसृत मार्गदर्शक सुचनेनुसार AHP या प्रकल्पांतर्गत कोणतेही आरक्षण ठेवावयाचे नाही,तर प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) - २.० योजनेत EWS लाभार्थ्यांसाठी किमान २५% घरकुले असतील व घरकुलांची किमान संख्या १०० इतकी राहील, असे किमान निकष आहेत.

परंतु प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या मुळ योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान म्हाडा मार्फत AHP प्रकल्पांतर्गत संबंधित मंडळांकडून लाभार्थीची निवड करताना म्हाडाच्या इतर गृहनिर्माण योजनांच्या धर्तीवर जाहिरातीमध्ये विविध जाती/प्रवर्ग निहाय आरक्षणे ठेवली आहेत, त्यामुळे अनेक योजनांतील घरकुल विक्रीकरिता २ -३ वेळा म्हाडा कडून जाहिराती देण्यात येऊन सुध्दा त्या त्या प्रवर्गातील लाभार्थी मिळत नसल्याने सदर योजना रखडल्या आहेत.

तरी वरील बाबींची दक्षता घेता AHP घटकांच्या सदनिकाच्या विक्रीकरिता प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या मुळ योजनेतील, तसेच सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना २.० मध्ये केंद्र शासनाच्या सुचनेनुसार अशी कोणतेही तरतुद ठेवू नये.

केंद्र शासनाच्या MoHUA ने प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या मुळ योजने विषयी प्रसृत केलेल्या मार्गदर्शक सुचनांमध्ये लाभार्थ्यांच्या पात्रता निकष विषयी पुढीलप्रमाणे नमुद केले आहे.

५.८ Preference under the Scheme, subject to beneficiaries being from EWS/LIG segments, should be given to Manual Scavengers, Women (with overriding preference to widows), persons belonging to Scheduled Castes/Scheduled Tribes/Other Backward Classes, Minorities, Persons with disabilities and Transgender.



Receipt No. 8386507(4)/2026/CHIEF ENGINEER 3 OFFICE AUTHORITY (Computer No. 8386507)
Generated from eOffice by HARISH JANARDAN KOTHARI, ASSISTANT(HJK)MHADA_KHADB, ASSISTANT, MHADA on 11/02/2026 11:35 AM

तर प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) -२.० या सध्याच्या योजनेत देखील दिनांक ०१/०९/२०२४ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार या विषयी पुढीलप्रमाणे तरतूद आहे.

३.४ Preference under the Scheme will be given to Widows, single women, Persons with Disabilities, Senior Citizens, Transgenders, persons belonging to Scheduled Castes/Scheduled Tribes, Minorities and other weaker and vulnerable sections of the society. Special focus will be given to Safai Karmi, Street Vendors identified under PMSVANidhi Scheme and different artisans under Pradhan Mantri -Vishwakarma Scheme, Anganwadi workers,building and other construction workers, residents of slums/chawls and other groups identified during operation of PMAY-U २.०.

४.५ States/UTs/ULBs should also identify the beneficiaries from the Special Focused Group (SFG), as mentioned in para ३.४, for inclusion in PMAY-U २.० and accordingly provide benefits to these groups on priority.

उपरोक्त तरतुदींनुसार स्पष्ट होते की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) व प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० या दोन्ही योजनांमध्ये लाभार्थी/अर्जदारांसाठी,जात/प्रवर्ग निहाय असे कोणतेही आरक्षण ठेवणे अपेक्षित नाही. तरी वरील तरतुदींचे पालन करुन या योजना मध्ये आरक्षण ठेवण्यात येऊ नये.

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
म्हाडा/प्राधिकरण तथा अभियान संचालक/
प्रधानमंत्री आवास योजना

**प्रति,**

१) मुख्य अभियंता-१,२,३/म्हाडा प्राधिकरण.
२) मुख्य अधिकारी, मुंबई,कोंकण,पुणे, नाशिक,नागपूर, अमरावती, छ.संभाजीनगर मंडळ, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडा प्राधिकरण.
४) सहमुख्य अधिकारी/मुं.इ.दु. व पु मंडळ व मुंबई मंडळ.

प्रत : माहितीकरिता – मुख्य अधिकारी तथा उपसचिव, राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU),गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई- ४०००३२ यांना माहितीस्तव अग्रेषित.



Receipt No. 8386507(4)/2026/CHIEF ENGINEER 3 OFFICE AUTHORITY (Computer No. 8386507)
Generated from eOffice by HARISH JANARDAN KOTHARI, ASSISTANT(HJK)MHADA_KHADB, ASSISTANT, MHADA on 11/02/2026 11:35 AM